# पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर

## विशेष प्रेस नोट

दि. ०३/०७/२०१८

काल दि. ०२/०७/२०१८ रोजी सायबर पोलीस स्टेशन येथे अशी गोपणीय माहिती मिळाली की, एक ईसम चपरासीपुरा येथे मोबाईल हॅण्डसेट विकत आहे, त्यावरून दोन पंचांसह तीथे जावुन त्यांची अंगझडती घेतली असता, त्याचेजवळ दोन मोबाईल हॅण्डसेट मिळुन आलेत. त्या मोबाईल हॅण्डसेटबाबत त्याने उडवाउडविची उत्तरे आरोपी नामे प्रशिक भगवानराव वानखेडे, वय २२ वर्ष, रा. राधीका नगर, मंगलधाम, अमरावती यास पोलीस स्टेशन सायबर येथे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१(१)(४) प्रमाणे अटक करण्यात आली.

त्याचेजवळ मिळुन आलेल्या मोबाईल हॅण्डसेटपैकी एक रेड मी या कंपनीचा मोबाईल हॅण्डसेट हा पोलीस स्टेशन गाडगे नगर येथील दाखल अप. क्र. ३६२/१८ कलम ३८० भा. दं. वि. मधील असल्याने त्यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली असुन, आरोपीचा पोलीस कोठडी रिमांड मिळवुन त्यास बारकाईने विचारपुस केली असता, व त्याचे घरझडतीमधुन एकुण २९ मोबाईल हॅण्डसेट मिळुन आले असुन, त्यात एक मोबाईल हॅण्डसेट हा पो. स्टे. नांदगावपेठ येथील अप. क्र. ४२४/२०१७ कलम ३७९ भा. दं. वि. मधील आहे.

सर्वच मोबाईल हॅण्डसेट हे महागडे असुन अॅण्ड्राईड ऑपरेटींग सिस्टीम असलेले आहेत. आरोपीकडुन जप्त करण्यात आलेल्या एकुण २९ मोबाईल हॅण्डसेटची किंमत अंदाजे ३,००,०००/— रूपये आहे.

आरोपी हा उघडे घरात अचानकपणे घुसून तीथे असलेले मोबाईल हॅण्डसेट चोरण्याच्या सवयीचा असुन त्याने जास्तीत जास्त मोबाईल हॅण्डसेट हे गाडगे नगर पो. स्टे. हद्दितुन चोरी केल्याचे सांगतो. तो विदयार्थ्यांच्या रूममध्ये जावुन तेथुन मोबाईल हॅण्डसेट चोरी करीत असतो.

आरोपीचा पोलीस कोठडी रिमांड दि. ०५/०७/२०१८ पावेतो मिळाला आहे.

सदर कार्यवाही पोलीस आयुक्त श्री दत्तात्रय मंडलीक यांचे मार्गदर्शनाखाली, सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अनिल कुरळकर, सहा. पोलीस निरीक्षक कांचन प. पांडे, पोलीस उप निरीक्षक श्री ईश्वर वर्गे, पोलीस हवालदार श्री जगदीश पाली, नापोकॉ श्री दिपक बदरके, नापोकॉ ताहेर अलि, पोकॉ सचिन भोयर, पोकॉ गोपाल सोळंके, पोकॉ सुधीर चर्जन, पोकॉ पंकज गाडे, पोकॉ मयुर बोरेकर, चालक नापोकॉ जाकीर खान यांनी केली.

Scanned by CamScanner